**<u>ठळक बातम्या</u>**

- विविध केंद्रीय संस्थांनी राज्यांमध्ये समन्वयानं काम करणं गरजेचं असून, घटनात्मक प्रमुख या नात्यानं राज्यपालांनी ही प्रक्रिया सुलभ करायला हवी असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव जिल्हा नामांतर प्रकरणात हस्तक्षेप करायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

- शेअर बाजारातल्या गेल्या पाच सत्रांमधल्या तेजीला लगाम/ सेन्सेक्समधे ८८५ अंकांची, तर निफ्टीत २९३ अंकांची घसरण

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या खेळाडूंची आगेकूच /नेमबाज मनू भाकरला तिसऱ्या पदकाची संधी

**<><><><><>**

लोकशाहीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध केंद्रीय संस्थांनी राज्यांमध्ये समन्वयानं काम करणं गरजेचं असून, घटनात्मक प्रमुख या नात्यानं राज्यपालांनी ही प्रक्रिया सुलभ करायला हवी असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीमध्ये राष्ट्रपती भवनामध्ये आयोजित राज्यपालांच्या दोन दिवसीय परिषदेचं उद्घाटन राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते आज झालं. त्यावेळी त्या बोलत होत्या.

या परिषदेत केंद्र-राज्य संबंधांसह सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणाशी

निगडित विविध मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

राज्यपालांनी पदग्रहण करताना घेतलेल्या प्रतिज्ञेचा संदर्भ देत, त्यांनी गेल्या दशकभरात समाजाच्या कल्याणासाठी राबवल्या गेलेल्या योजना आणि देशाने साधलेला विकास, याबाबत लोकांमध्ये जाणीव निर्माण करण्याची घटनात्मक जबाबदारी पार पाडावी, असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी परिषदेला संबोधित करताना सांगितलं.

राज्यपालांनी केंद्र आणि राज्य यांच्यात समन्वय साधावा आणि जनतेशी तसंच सामाजिक संस्थांशी संवाद साधून वंचितांना सहकार्य करावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या परिषदेला संबोधित करताना केलं.

या परिषदेत केंद्रीय मंत्री, नीती आयोगाचे उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मंत्रालयातले वरिष्ठ अधिकारी देखील सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव या जिल्ह्यांच्या नामांतराला आव्हान देणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली. नाव देण्याचा आणि बदलण्याचा अधिकार कायद्यानं राज्य सरकारला दिलेला आहे असं मत नोंदवत सर्वोच्च न्यायालयानं नामांतर प्रकरणात हस्तक्षेप करायला नकार दिला. जिल्ह्याचं नाव बदलायचं असेल, तर सूचना आणि हरकती मागवल्या जातात. मात्र औरंगाबाद नामांतराच्या वेळी असं घडलं नसल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला होता. मात्र, या प्रकरणी न्यायालयीन पुनरावलोकन करण्याची गरज नसल्याचं सांगून सर्वोच्च न्यायालयानं ही याचिका फेटाळली.

**<><><><><>**

नीट-यूजी परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेत गैरप्रकार होऊन परीक्षेच्या शुचितेला धक्का लागल्याचं दाखवणारा कोणताही पुरावा नसल्यामुळे ही परीक्षा रद्द न करण्याचा निर्णय घेतल्याचं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं. या निर्णयामागची कारणं सांगणारा तपशीलवार निकाल न्यायालयानं आज जाहीर केला. या परीक्षा घेण्यासंदर्भात वारंवार बदलणाऱ्या भूमिकेवरून सर्वोच्च न्यायालयानं आज राष्ट्रीय परीक्षा संस्थेवर ताशेरे ओढले. परीक्षार्थींना केंद्र बदलण्याची, चुकीच्या पद्धतीनं नवीन नोंदणी करण्याची परवानगी देणं, चुकीची प्रश्नपत्रिका मिळाल्यानं विद्यार्थ्यांचा वाया गेलेला वेळ भरून काढण्यासाठी त्यांना वाढीव गुण देणं इत्यादी निर्णयांवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी टीका केली.

<><><><><>

नागपूर जिल्ह्यासाठी बाराशे कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीचा विकास आराखडा जिल्हा नियोजन विकास बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ५ हजार कोटीपेक्षा जास्त मूल्याची कामं राज्य शासनाच्या वतीने करण्यात येतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समितीच्या बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना दिली. नागपूर शहरात सगळीकडे विकासकामं सुरू असल्याने खोदकाम आणि वाहतूक वळवण्यात आल्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे, पण ही कामं वेगाने पूर्ण करू, असं आश्वासनही फडनवीस यांनी दिलं.

<><><><><>

रक्षाबंधनाच्या सणापूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचे पैसे जमा होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. आज सिल्लोड इथं या योजनेच्या लाभार्थी महिलांना प्रमाणपत्रांचं

वाटप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पणनमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. विरोधकांनी या योजनेच्या अंमलबजावणीत अडथळे आणण्याचे प्रयत्न केले तरी, न्यायालय माझ्या बहिणींना न्याय देईल,असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' योजनेसाठी मराठी भाषेत केलेले अर्ज ग्राह्य धरले जातील, असं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज स्पष्ट केलं. या योजनेला राज्यात उत्तम प्रतिसाद मिळत असून अर्जाच्या प्रक्रियेत काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे मराठी भाषेतल्या अर्जांचा विषय चर्चेला आला होता. परंतु ही अडचण संबंधित बँकेनं सोडवली असून मराठीत केलेले अर्ज नामंजूर किंवा अमान्य होणार नाहीत. हे अर्ज इंग्रजीत पुन्हा भरावे लागतील असा अपप्रचार केला जात आहे, त्याची गरज नाही, असंही तटकरे यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या कमकुवत स्थितीच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी विक्रीवर जोर दिल्यानं शेअर बाजारातल्या गेल्या पाच सत्रांमधल्या तेजीला आज आळा बसला. मुंबई शेअर बाजारात आज दिवसभर मोठे चढउतार दिसून आले. बाजार बंद होताना सेन्सेक्स ८८५ अंकांनी घसरला आणि ८० हजार ९८१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २९३ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ७१७ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत आगेकूच केली. नेमबाजीत दोन पदकांची कमाई करणारी मनू भाकर महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात ५९० गुण कमावून अंतिम फेरीत दाखल झाली. त्यामुळे तिला या स्पर्धेत तिसरं पदक मिळवण्याची संधी आहे. तिरंदाज अंकिता भकत आणि धीरज बोम्मदेवर यांनी स्पेनला ३-५ असं नमवून उपांत्य फेरी गाठली. हॉकीत भारताच्या पुरुष संघानं ऑस्ट्रेलियाच्या संघावर ३-२ अशी मात केली.

दरम्यान, नौकानयन स्पर्धेत विष्णू सर्वनन आणि नेत्रा कुमनन, तर गोल्फमध्ये शुभंकर शर्मा आणि गगनजीत भुल्लर आज आपापले सामने खेळतील. बॅडमिंटनमध्ये भारताचा एकमेव खेळाडू लक्ष्य सेन याचा सामना पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत चायनीज तैपेईच्या चौ तेइन चेन याच्याशी होणार आहे. याशिवाय अंकिता ध्यानी आणि पारुल चौधरी महिलांच्या ५ हजार मीटर शर्यतीत, तर तजिंदरपाल सिंह तूर पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत उतरणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघाच्या श्रीलंका दौऱ्यात एकदिवसीय मालिकेतला पहिला सामना आज कोलंबो इथं सुरु आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून २३० धावा केल्या. दुनीत वेल्लालागेनं सर्वाधिक नाबाद ६७ धावा केल्या. तर पथुम निसंकानं ५६ धावांचं योगदान दिलं. भारतातर्फे अर्शदीप सिंह आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा, भारताच्या ६ व्या षटकात बिनबाद ५१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

दर्जेदार आणि अभिरुची संपन्न आशय प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी लोकप्रिय असलेल्या दूरदर्शन वाहिनीनं चार नवीन कार्यक्रमांची मेजवानी आणली आहे. यातले तीन कार्यक्रम सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहेत.

या कार्यक्रमांत आमची अनन्या ही कौटुंबिक मालिका, आमचे हे आमची ही हा सेलिब्रिटी जोडप्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आणि वाचू आनंदे हा नामवंत साहित्यिकांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम असणार आहे. या कार्यक्रमांविषयी दूरदर्शन सह्याद्री वाहिनीचे कार्यक्रम प्रमुख संदीप सूद यांनी वार्ताहर परिषदेत सविस्तर माहिती दिली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात घाट परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार ते अती जोरदार, तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. या काळात किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**